प्रती,

मा. जनसंपर्क अधिकारी सो. पोलीस आयूक्त कार्यालय, पुणे. शहर

**प्रतीवेदक** - आर. के.धिगे, पोलीस उपनिरीक्षक, दिघी पोलीस स्टेशन, पुणे

**विषय** :- अनोळखी मयताची माहिती स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, दिघी पोलीस स्टेशन, गुन्हा रजि.१६६/२०१८ भादंवि कलम-३०४(अ) ३४ मधील भगवान गायकवाड पुर्ण नाव माहीत नाही वय २९ वर्षे रा. राधे रिगल रेसीडेन्सी लेबर कॅम्प धायरकरवस्ती डुडुळगाव ता.हवेली जि.पुणे. हा दि. २१/०६/२०१८ रोजी ११/२० वा. चे सुमारास राधे रिगल बांधकाम रेसिडन्सी बांधकाम साईटवर धायरकरवस्ती डुडुळगाव ता.हवेली जि.पुण येथे आर.सी.सी बांधकामासाठी लावलेली लोखंडी क्रेन मालवाहु लिप्टचे लोखंडी टॉवर काढण्यासाठी ल्पिटमधुन सहाव्या मजल्यावर जात असताना अचानक मालवाहु लिप्टचे वायर रोप तुटुन मालवाहु लिप्टसह तो खाली पडुन जबर जखमी झाल्याने त्यास वाय.सी.एम हॉस्पीटल पिंपरी पुणे येथे आणले असता तेथील डॉक्टरांनी एम.एल.सी. नं. १९७/१८ अन्वये तपासणी करुन तो डॉक्टर तपासणीपुर्वीच मयत झाला असल्याचे १२/३० वा. घोषित केले. मयत इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे. -

अनोळखी मयत पुरुष नामे भगवान गायकवाड वय अदांजे २९ वर्षे रा. राधे रिगल रेसीडेन्सी लेबर कॅम्प धायरकरवस्ती डुडुळगाव ता.हवेली जि.पुणे. शरीरबांधा सडपातळ, उंची ५ फुट ४ इंच, रंगाने निम गोरा, चेहेरा उभट, नाक सरळ, दाढी –केलेली, केस काळे वाढलेले, कपाळ मध्यम, मिशी बारीक , पोटावर तीळ.

येणेप्रमाणे वर्णनाच्या अनोळखी मयत इसमाचे नातेवाईकांचा शोध होणेकामी व तपासकामी बेवारस मयताच्या वर्णनाची माहीती स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द होणेस विनंती आहे.